# बृहन्मुंबई महानगरपालिका

जीउ/1525/स.अभि. (घकव्य)/दि. 21.07.2025

## स्वारस्याची अभिव्यक्ती (EOI)

### जाहिरात

विषयः- जी/उत्तर विभागात गणेशोत्सव 2025 दरम्यान दादर, माहिम व धारावी येथेनैसर्गीक व कृत्रिम तलावाच्या ठिकाणी साफसफाई व निर्माल्य व्यवस्थापन करणे करीता सामाजिक संस्थांची नेमणुक करण्याबाबत.

जी/उत्तर विभागात गणेशोत्सव 2025 दरम्यान दरम्यान दादर, माहिम व धारावी येथे कृत्रिम तलावाच्या ठिकाणी साफसफाई व निर्माल्य व्यवस्थापन करणे करीता अशासकिय नोंदणीकृत जसे मजूर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सह. संस्था, औद्योगीक सेवा सह. संस्था, महिला बचत गट इ. कडून अर्ज मागविण्यात येत आहे. सदर कामासाठी स्थानिक संस्था, 2023-24 किंवा 2024-25 वर्षाचा लेखा परिक्षण अहवाल तसेच MCGM Vendor Registration असणेबंधनकारक आहे. प्राप्त अर्जामधून पात्र संस्थांची यादी तयार करुन सोडत पध्दतीने निवड करण्यासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

तसेच अर्जाचा नमुना जी/उत्तर विभाग कार्यालयातील सहा. अभियंता (घकव्य) यांच्या सुचना फलकावर जाहिरात प्रदर्शित करुन विषयांकीत कामाकरिता छाननी शुल्क रु. 363 अधिक 18% वस्तु व सेवाकर असे एकुण रु. 428.34 रोख स्वरुपात (ना परतावा) व इसारा अनामतरक्कम रु. 500/- (परतावा) या अटिवर दि. 21.07.2025 ते दि. 25.07.2025 सकाळी 11.00 ते दुपारी 4.00 वाजेपर्यंत या वेळेत अर्ज संस्थेच्या लेटर हेडवर केलेल्या मागणीपत्रानुसारच मिळू शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पध्दतीने याशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप सहा. अभियंता (घकव्य) जी/उ योजनेच्या अटि व शर्तीनुसार करतील.

विषयांकीत कामाकरीता रस्तेसाफसफाईचा अनुभव असणे बंधनकारक आहे. इच्छूक संस्थांनी अधिक तपशील, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी जी/उ कार्यालयातील (घकव्य) जी/उत्तर विभाग, पहिला मजला, रुम नं. 35 येथे संपर्क करावा. अर्ज स्विकारण्याची तारीख दि. 26.07.2025 रोजी दुपारी 3.00 वाजेपर्यंत असेल. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल केलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही.

सही/- (21.07.2025)

सहा. अभियंता (घ.क.व्य), जी/उत्तर विभाग